आर.सी.एस क्र.८/२०२३
उत्तम वि. शुभा
नि.क्र.४६

**प्रतिवादीतर्फे क्र.१ साक्षीदार स्वत: चा सरतपास**
देवाची शपथ खरे सांगतो
नाव –रघुनाथ झामाजी भुडे.

**प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ चा सरतपास शपथेवर प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे वकील श्री एस.एम.पिंपळकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू.**

८. माझे शपथपत्र नि. क्र.४६ मधील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे.

९. आता मला नि.क्र.३७ वरिल वाटणीपत्र दाखविण्यात आले ते मी व माझा भाऊ पुरूषोत्तम यांच्यामध्ये झालेले आहे. सदर वाटणीपत्र हे शेत सर्व्हे नं.४७ व ५० या शेतमिळकतीबाबत झालेले आहे. सदर शेती ही मौजा बेलपेठ ता.उमरेड, जि.नागपूर येथिल आहे. सदर वाटणीपत्राने मला सर्व्हे न.४७ मधील ३ हेक्टर शेतजमिन मिळाली होती. तसेच पुरूषोत्तम यांना सर्व्हे न.४७ पैकी उरलेली १.१७ हे.आर. जमिन व सर्व्हे न.५० ची जमिन मिळाली होती. सदर वाटणीपत्र हे नोंदणीकृत होते, त्यावर माझी, पुरूषोत्तम यांची व दोन साक्षीदार नामे विनोद सोनारकर व उत्तम भूडे यांच्या सह्या आहेत. तसेच त्यांच्या आंगठ्याच्या निशानी व त्यांचे फोटो असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्याला यापुर्वीच नि.क्र.३७ देण्यात आलेला आहे.

१०. आता मला मौजा बेलपेठ येथील सर्व्हे न.१०८ व ४८ या शेतीची मोजणी केली होती त्या मोजणीसाठी मला नोटीस आली होती व त्याप्रमाणे मी मोजणीकामी उपस्थित होतो. सदर मोजणी माझ्यासमक्ष झाली हाती, त्यावर उपस्थित म्हणुन माझी सही अ.क.१ वर आहे. त्यानंतर मी सर्व्हे नंबर ४७ ची मोजणी केली होती. सदर मोजणी करण्याकामी मी अर्ज केला होता व त्यानुसार मोजणी झाली होती व त्यावेळी मी उपस्थित होतो.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी व प्रतिवादीचे वकील गैरहजर सबब प्रकरण उलटतपासासाठी तहकूब.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या., क.स्तर, उमरेड
दि ०५.०१.२०२६

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या., क.स्तर, उमरेड